18-03-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 17-03-2025 21:23 Page 1



## निवडक



चावडी : शिवस्मारकास अभिषेक घातल्यानंतर, कुंदन भगत, प्रतीक देसाई, नवज्योत नाईक गावकर, संजू देसाई व इतर.

### चावडी येथे शिवजयंतीनिमित्त शिवस्मारकास अभिषेक

टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. १७ :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या तिथीनुसार जयंतीनिमित्त शिवस्मारक सांस्कृतिक आणि क्रिडा मंडळ, काणकोण या संस्थेतर्फे चावडी येथील शिवस्मारकास धार्मिक रितीरिवाजानुसार पुरोहित चैतन्य यांच्या मार्गदर्शनाखाली अभिषेक करुन शिवजयंती साजरी केली. तर संध्याकाळी शिवजयंती निमित्त दिपोत्सव साजरा केला. यावेळी शिवप्रेमी पंकज नाईक गावकर, कुंदन भगत, प्रतीक देसाई, नवज्योत नाईक गावकर, संजू देसाई व अन्य उपस्थित होते.

---

### लोहिया मैदान ट्रान्सफोरमरवर उद्या खंडित वीजपुरवठा

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १७ :** लोहिया मैदान ट्रान्सफोरमरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने बुधवार दि. १९ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत प्युमा शोरूम, न्यू बँक ऑफ बडोदा, सिनियर क्लॉथ आणि टेलर, खादी इंडिया, एमएमसी गार्डनसमोर, लोटलीकर शॉप, उषा स्टोर्स आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे लीली गार्मेंट ट्रान्सफॉर्मरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने दि. २० रोजी सकाळी ९ ते संध्या ७ वाजेपर्यंत फुड सेंटर, वाज एन्टरप्रायझेस, कामत हॉटेल, कंदिल बार रेस्टॉरंट, जुना पिकअप स्ट्रँड पार्कींग, रॉयल फुड्स, मोबाईल रिपेर शॉप आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### कोंजे जुने डीटीसीवर आज खंडित वीजपुरवठा

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १७ :** कोंजे जुने डीटीसीवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने मंगळवार दि. १८ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत रोवले भागात वीजपुरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे रोवले डीटीसीवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने २९ मार्च २०२५ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत कोंजे येथील कारमे चॅपेल जवळच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### डॉ. आंबेडकर सामाजिक पुरस्कारासाठी अर्ज

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १७ :** गोवा सरकारच्या समाज कल्याण संचालनालयाने अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी २५ वर्षे किंवा त्याहून अधिक काळ काम करणाऱ्या व्यक्तींकडून डॉ. आंबेडकर सामाजिक पुरस्कारासाठी अर्ज मागविले आहेत. या योजनेचा उद्देश म्हणजे अनुसूचित जातींच्या घटकांचा सामाजिक-आर्थिक, शैक्षणिक आणि सामान्य राहणीमानाचा दर्जा सुधारण्यासाठी काम करणाऱ्या व्यक्तीस प्रोत्साहित करणे असा आहे.

इच्छुक उमेदवाराचे वय ६० वर्षांपेक्षा जास्त असावे आणि त्यांनी गोव्यातील अनुसूचित जातींच्या कल्याणासाठी काम केलेले असावे. इच्छुक व्यक्तींनी विहित अर्ज नमुना समाज कल्याण संचालनालय, फार्मासिया साल्सेट समोर, १८ जून रोड, पणजी येथून मिळवावे. पूर्ण भरलेले अर्ज आवश्यक दाखल्यांसह सादर करण्याची शेवटची तारीख १ एप्रिल २०२५ अशी आहे.

---

### अभियांत्रिकी पदवी परीक्षेसाठी अर्ज करण्यासंबंधी सूचना

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १७ :** गोवा विद्यापिठाने मे, जून २०२५ मध्ये होणाऱ्या अभियांत्रिकी पदवी (सेमिस्टर पाच ते आठ ) परीक्षेसाठी अर्ज करण्याची आणि परीक्षेची तारीख निश्चित केली आहे. मे,जून २००५ ची परीक्षा २६ मे २०२५ पासून सुरू होईल. ऑफलाईन अर्ज (उशिरा शुल्काशिवाय) १७ ते २८ मार्च २०२५ पर्यंत सुपूर्द केले पाहिजे. ऑफलाईन अर्ज (उशिरा शुल्क रूपये ३४० सह) ४ एप्रिल २०२५ पर्यंत स्वीकारण्यात येईल.

---

### कळंगुट येथे २० रोजी शिमगोत्सव मिरवणूक

टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १७ :** कळंगुट शिमगोत्सव समितीतर्फे पर्यटन खाते, कळंगुट पंचायत व शांतादुर्गा संस्था पंचायतन, कळंगुट यांच्यातर्फे शिमगोत्सव मिरणूक, स्पर्धांचे गुरुवार दि. २० रोजी आयोजन केले आहे. शिमगोत्सव मिरवणुकीला संध्याकाळी ५.३० वाजता मुरवीधर मंडप, नाईकवाडा येथून सुरूवात होईल. त्यानंतर शांतादुर्गा मंदिर प्रांगण, टिटो कळंगुट येथे समारोप सोहळा होईल, असे अध्यक्ष सुदेश शिरोडकर, सचिव आनंद (सुरेश) सावर्डेखर, खजिनदार द्रितेश सिमेपुरुषकर यांनी कळविले आहे.

---

### दुर्गामात मंडळातर्फे कार्यक्रम उत्साहत

टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १७ :** महिलांना त्यांच्या हक्काविषयी जागरूक करणे हे जागतिक महिला दिन साजरा करण्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. आजचे स्त्री पुरुष समानता ही उज्वल भविष्यासंदर्भात चांगली कृती आहे. प्रत्येक महान व्यक्तीच्या जीवनात आणि यशात स्त्रीयांचा सिंहाचा वाटा असतो, असे उद्गार फोंड्याचे माजी नगराध्यक्ष विश्वनात (अपूर्व) दळवी यांनी काढले.

तळे - दुर्गाभाट - फोंडा येथील दुर्गामाता महिला मंडळाच्या महिला दिनाच्या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. दळवी यांच्या हस्ते या वेळेस विविध क्षेत्रातील कर्तृत्वान महिलांचा सन्मान करण्यात आला.

---

### फातर्पा येथे आज गुलालोत्सव

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १७ :** फातर्पा येथील श्री शांतादुर्गा फातर्पेकरीण देवस्थानात वार्षिक तोपशो - गुलालोत्सव मंगळवारी दि. १८ रोजी होणार आहे. सकाळी नित्य धार्मिक विधी होईल. संध्याकाळी ४ वाजता देवीची पालखी मंदिरातून पारंपरिक मार्गाने गुलाल उधण्यासाठी प्रस्थान करणार आहे. होळी पार करून झाल्यानंतर पालखीचे भाविकांना दर्शन घेण्यास मिळेल. पालखी मंदिरात आल्यानंतर आरती, प्रसाद वाटपाने उत्सवाची सांगता होणार आहे.

# घरासमोर कचऱ्याचा ढीग; दाद कुणाकडे मागणार?

## दुर्गंधीने घरात राहणे कठीण | आरोग्य धोक्यांबाबत रझिया खान यांची चिंता

टीम दैनिक हेराल्ड



**शिरोडा, दि. १७ :** भाटी करई, शिरोडा येथील रझिया खान यांनी आपल्या घरासमोर वाढत असलेल्या कचऱ्याच्या ढिगामुळे आरोग्य धोक्यांबाबत चिंता व्यक्त केली आहे. गेल्या काही महिन्यांपासून घरासमोर सतत कचरा आणि अन्न टाकले जात असल्याने घरातील वातावरण असह्य झाले आहे, असे रझिया यांनी सांगितले.

रझिया यांनी सांगितले की, कचऱ्यामुळे उठणाऱ्या दुर्गंधीने घरात राहणे कठीण झाले आहे. माश्या आणि कीटकांचा उपद्रव वाढल्याने कुटुंबाला गंभीर आरोग्य धोके निर्माण झाले आहेत. स्थानिक पंचायत आणि शिरोडा आरोग्य केंद्राकडे वारंवार तक्रार करूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

त्यांनी पुढे सांगितले की, पंचायत सदस्यांनी ही केवळ तात्पुरती डंपिंग साइट असल्याचे सांगून लवकरच कचरा हटवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात कचरा हटवण्यास कोणतीही कारवाई झाली नाही. परिणामी, कचऱ्याचे ढीग दिवसेंदिवस वाढत असून आरोग्य धोक्यांमध्ये वाढ होत आहे. गायी आणि भटके कुत्रे वारंवार कचराकुंडीभोवती जमत आहेत. त्यामुळे परिसर अधिक दूषित होत आहे. डास आणि माश्यांचा उपद्रव वाढला असून ते अन्नावर बसून ते दूषित करत आहेत. या अस्वच्छतेमुळे घरात असह्य परिस्थिती निर्माण झाली आहे आणि कुटुंबाच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे, अशी कैफियत रझिया यांनी मांडली.

खान यांनी स्थानिक प्रशासनाकडे त्वरित कारवाई करण्याची मागणी केली आहे. परिसरातील कचरा त्वरित साफ करावा, डास आणि कीटकांच्या प्रादुर्भावावर नियंत्रण मिळवण्यासाठी उपाययोजना कराव्यात आणि नियमित कचरा संकलन व्यवस्था सुरू करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, शिरोडा सरपंचाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा फोन बंद असल्याचे आढळले.

# कळंगुटमध्ये ओडिशातील पर्यटकांवर टॅटू कलाकार आणि दलालांचा हल्ला

टीम दैनिक हेराल्ड

**कळंगुट, दि. १७ :** कळंगुट परिसरात टॅटू कलाकार आणि दलालांच्या मोठ्या गटाने ओडिशातील तीन पर्यटकांवर हल्ला आणि विनयभंग केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे.

ओडिशातील देव पी, त्यांची पत्नी रश्मी आणि भाऊ अरुण कुमार गोव्यात सुट्टीसाठी आले होते. शुक्रवारी दुपारी कळंगुटमध्ये चेक-इन केल्यानंतर ते समुद्रकिनाऱ्याकडे जात होते. त्या वेळी एका व्यक्तीने देवला टॅटू बनवण्याची ऑफर दिली. नकार देऊनही त्या व्यक्तीने देवचा हात धरून जबरदस्तीने जवळच्या टॅटू दुकानात ओढले.

मी टॅटू काढण्यास नकार दिला तेव्हा त्यांनी माझ्यावर हल्ला केला. लवकरच १५-२० लोकांनी वेढले आणि जेव्हा आम्ही निघण्याचा प्रयत्न केला तेव्हा ही संख्या १०० पर्यंत वाढली,असे देव यांनी सांगितले. फक्त एका स्थानिक महिलेच्या मदतीमुळेच आम्ही वाचलो, असेही ते म्हणाले.

पर्यटकांना मदत करणाऱ्या स्थानिक महिला सियाना फर्नांडिस यांनी सांगितले की, तिने या परिसरात वाढत्या दलालांविरुद्ध वारंवार तक्रारी केल्या होत्या. या घटनेनंतर तिने तातडीने पोलिसांना संपर्क साधला. मात्र, पोलिसांनी पर्यटकांना तडजोड करण्याचा सल्ला दिला. पोलिसांनी आम्हाला हॉटेलमध्ये सोडले आणि दुसऱ्या दिवशी टॅटू शॉप मालकाशी जबाब नोंदवण्यासाठी येण्यास सांगितले. मात्र, आम्ही परतल्यावर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास किंवा तक्रार नोंदवण्यास नकार दिला. पोलिस आणि टॅटू शॉप मालकांमध्ये संगनमत असल्याचा संशय आहे असा देव यांनी आरोप केला.

ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या हंगामात पर्यटकांना होणाऱ्या त्रासाबाबत फर्नांडिस आणि इतर पर्यटन क्षेत्रातील हितधारकांनी यापूर्वी तक्रारी केल्या होत्या. त्यानंतर कळंगुट पोलिस आणि टुरिस्ट पोलिस युनिटने दलालांविरुद्ध मोहीम राबवून काहींना अटकही केली होती. परंतु, ते काही दिवसांतच परत आले. यामागे मोठ्या 'सेटिंग'चा संशय आहे. संध्याकाळी या भागात गेल्यास तुम्हाला शेकडो दलाल पर्यटकांना फसवत असल्याचे दिसेल,असे फर्नांडिस यांनी सांगितले. कळंगुटचे आमदार मायकल लोबो यांनी नुकतीच या भागाची पाहणी केली आणि दलालांविरुद्ध कारवाईचे आश्वासन दिले होते. यापूर्वी, जानेवारी महिन्यातकळंगुट पंचायतीने या भागातील अनेक दुकानांवर छापे टाकले होते. सरपंच जोसेफ सिक्वेरा यांनी सांगितले की, कपड्यांचे परवाने असलेल्या काही दुकानांमध्ये टॅटू पार्लर आणि इतर व्यवसाय बेकायदेशीरपणे चालवले जात होते. अशा पाच दुकानांवर कारवाई करण्यात आली आहे. पर्यटकांना समुद्रकिनाऱ्यावर सुरक्षित वातावरण मिळाले पाहिजे. कळंगुट, बागा आणि टिटोज लेनमधील बेकायदेशीर आणि अनधिकृत विक्रेत्यांविरुद्ध कारवाई सुरूच राहणार असल्याचे सिक्वेरा यांनी स्पष्ट केले.

# मंगळुरूत ७५ कोटींचे एमडीएमए जप्त

### दोन दक्षिण आफ्रिकन नागरिकांना अटक

**मंगळुरू, दि. १७ :**

मंगळुरू पोलिसांनी राज्यातील आतापर्यंतची सर्वात मोठी ड्रग्ज कारवाई करत तब्बल ७५ कोटी रुपये किमतीचे ३७ किलो एमडीएमए जप्त केले आहे. या प्रकरणात दोन दक्षिण आफ्रिकन नागरिकांना अटक करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी रविवारी दिली.

मंगळुरूचे पोलिस आयुक्त अनुपम अग्रवाल यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, ही कारवाई सहा महिन्यांपूर्वी झालेल्या अटकेनंतर करण्यात आली. सप्टेंबरमध्ये मंगळुरूच्या पंपवेल येथे हैदर अलीला अटक करून त्याच्याकडून १५ ग्रॅम एमडीएमए जप्त करण्यात आले होते.

तपासादरम्यान पोलिसांना पीटर नावाच्या नायजेरियन नागरिकाचा माग लागला. त्याला बेंगळुरूमध्ये ६ कोटी रुपयांच्या एमडीएमएसह अटक करण्यात आली होती. पुढील तपासात दिल्ली आणि बेंगळुरू दरम्यान हवाई मार्गाद्वारे तस्करीशी संबंधित आंतरराष्ट्रीय ड्रग्ज नेटवर्कचा तपास करण्यात आला.

गुप्त माहितीच्या आधारे मंगळुरू सेंट्रल क्राइम ब्रँच पोलिसांनी १४ मार्च रोजी बेंगळुरूमधील नीलाद्री नगर येथे दोन दक्षिण आफ्रिकन नागरिकांना अटक केली. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे बांबा फॅन्ट (३१) आणि अबीगेल अ‍ॅडोनिस (३०) अशी आहेत. त्यांच्या ताब्यातून एमडीएमए, चार मोबाईल फोन, पासपोर्ट आणि १८,००० रुपये रोख जप्त करण्यात आले.

पोलिसांच्या तपासात आरोपी हे बेंगळुरू आणि इतर भागात नायजेरियन तस्करांना ड्रग्ज पुरवत असल्याचे उघड झाले आहे. त्यांच्याकडे प्रवासासाठी बनावट पासपोर्ट आणि व्हिसा असल्याचा संशय असून, या प्रकरणातील मोठ्या नेटवर्कचा शोध घेण्यासाठी तपास सुरु असल्याचे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले.

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी या कारवाईचे कौतुक केले आहे. त्यांनी म्हटले, ७५ कोटी रुपयांचे ३७ किलो एमडीएमए जप्त करून पोलिसांनी हजारो तरुणांचे जीव वाचवले आहेत.

आम्ही सत्तेत आल्याच्या पहिल्या दिवसापासून ड्रग्ज मुक्त समाज निर्माण करण्यासाठी कटिबद्ध आहोत. ड्रग्ज विक्री आणि सेवनाविरोधात कठोर कारवाई सुरूच राहील, असेही मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी 'एक्स'वर पोस्ट केले.

मुख्यमंत्र्यांनी पुढे सांगितले की, मी काही महिन्यांपूर्वी मंगळुरूला भेट दिली असता जिल्ह्यातील लोकांना ड्रग्ज मुक्त वातावरण निर्माण करण्याचे आश्वासन दिले होते. आता ही मोठी कारवाई झाल्यामुळे राज्यभर पसरलेल्या ड्रग्ज नेटवर्कचे उच्चाटन करण्याचा आमचा निर्धार दृढ झाला आहे.

# राय ग्रामसभेत मोबाईल टॉवरच्या जागेवरून वाद

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १७ :** राय ग्रामसभेत प्रस्तावित मोबाईल टॉवरच्या जागेबद्दल गावकऱ्यांनी तीव्र आक्षेप नोंदवले असून, टॉवरला अधिक योग्य ठिकाणी हलवण्याची मागणी करण्यात आली आहे. सद्यस्थितीत हा टॉवर निवासी परिसर आणि शाळेजवळ असल्याने स्थानिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो, अशी गावकऱ्यांची भूमिका आहे.

सरपंच मारियो डिसोझा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामसभेत स्थानिकांनी या मुद्द्यावर नाराजी व्यक्त केली. सरपंच डिसोझा यांनी ग्रामस्थांच्या चिंता मान्य करत सांगितले की, पंचायतीने यापूर्वीच संबंधित अधिकाऱ्यांना पत्र पाठवून मोबाईल टॉवरचे स्थलांतर करण्याची विनंती केली आहे.

याबाबत स्थानिक ग्रामस्थ जाओ पाउलो फर्नांडिस यांनी स्पष्ट केले की, टॉवरच्या स्थापनेला नव्हे, तर त्याच्या सध्याच्या जागेला विरोध आहे. रहिवासी क्षेत्र आणि शाळेच्या जवळ टॉवर असल्यामुळे आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो, असे फर्नांडिस यांनी सांगितले. त्यांनी टॉवरच्या जागेची निवड कशा पद्धतीने करण्यात आली याबाबतही चौकशी केली.

सरपंच डिसोझा यांनी पंचायतीने यापूर्वीच या संदर्भात न्यायालयात याचिका दाखल केल्याची माहिती दिली. तसेच, ग्रामस्थांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी सर्व आवश्यक पावले उचलण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ग्रामसभेत अन्य महत्त्वाच्या विषयांवरही चर्चा झाली. यामध्ये रस्ते आणि ड्रेनेज व्यवस्था, राय फुटबॉल मैदानाची देखभाल, सेंद्रिय कचरा व्यवस्थापन, वाहतूक नियंत्रण आणि पायाभूत सुविधांच्या विकासासंदर्भातील प्रस्तावांचा समावेश होता.

शाळेच्या वेळेत पोलिस अधिकारी आणि वाहतूक वॉर्डन तैनात करण्याची गरज यावरही भर देण्यात आला. याशिवाय, ग्रामसभेत वाहतूक नियंत्रणासाठी सिग्नल, सीसीटीव्ही कॅमेरे आणि स्पीड ब्रेकर बसवण्याचे ठराव मंजूर करण्यात आले.

दरम्यान, सदोष स्पीड ब्रेकरमुळे मृत्युमुखी पडलेल्या स्थानिक रहिवाशाच्या कुटुंबासाठी भरपाई देण्याचा प्रस्तावही संमत करण्यात आला. गावकर कॉलेजजवळ रिटेनिंग वॉल बांधणे, आर्लेम जंक्शनमधील नाल्यांची स्वच्छता करणे आणि वृद्धांसाठी पंचायत कार्यालयात लिफ्ट बसवण्याचे ठरावही मंजूर करण्यात आले. वाहतूक नियंत्रणासाठी ॲलेक्स सिक्वेरा यांच्या घराजवळ आणि राय जंक्शन येथे दुभाजक बसवण्याचा ठराव ग्रामसभेत मंजूर करण्यात आला.

# घरगुती बायोगॅस प्लांटद्वारे इंधन बचतीचा यशस्वी प्रयोग

## मये मधील चोपडेकर कुटुंब ठरले बायोगॅस वापरणारे राज्यातील पहिले कुटुंब

एरविन फोन्सेका
टीम दैनिक हेराल्ड




**मये, दि. १७ :** शाश्वत जीवनशैलीच्या दिशेने उल्लेखनीय पाऊल उचलत, मयेमधील हातुरली गावातील रूपेश चोपडेकर आणि त्यांच्या कुटुंबाने घरगुती बायोगॅस प्लांट यशस्वीरित्या सुरू केला आहे. या उपक्रमामुळे केवळ घरगुती कचऱ्याची विल्हेवाट लावली जात नाही, तर दररोजच्या स्वयंपाकासाठी स्वच्छ गॅसही निर्माण होत आहे. चोपडेकर कुटुंब हे गोव्यातील पहिले कुटुंब आहे, ज्यांनी घरगुती बायोगॅस प्लांट बसवला आहे. यामुळे राज्यातील इतरांसाठी हे एक प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे. शिरोडा आणि हरमल कॉलेज या दोन शैक्षणिक संस्थांच्या यादीत आता चोपडेकर यांचा उपक्रम समाविष्ट झाला आहे.

रूपेश चोपडेकर यांच्या मते, प्लांट एका वर्षापेक्षा अधिक काळ कोणत्याही देखभालीशिवाय सुरळीतपणे कार्यरत आहे. उन्हाळा आणि पावसाळ्यातही प्लांटने कोणत्याही अडचणीशिवाय काम केले आहे. प्लांट बसवण्यापूर्वी आम्ही त्याच्या ऑपरेशनचा अभ्यास केला आणि त्याचे फायदे समजून घेतले, असे चोपडेकर यांनी सांगितले. प्लांटच्या यशस्वी स्थापनेसाठी म्हापसा येथील न्यू इंडिया मल्टीपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी (एनआयएमएस)चे व्यवस्थापकीय संचालक समीर मोराजकर आणि अध्यक्ष ॲड. तानाजी सावंत यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या प्लांटची क्षमता २ घनमीटर असून, त्याची किंमत सुमारे ₹ ६५ हजार आहे. केंद्र सरकारच्या नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या अनुदानामुळे हा खर्च निम्म्याने कमी झाला आहे.

हा प्लांट दररोज सुमारे ५ किलो स्वयंपाकघरातील कचरा (अंड्याचे कवच वगळून) प्रक्रिया करून दोन तासांसाठी पुरेल इतका स्वच्छ गॅस निर्माण करतो. यासाठी प्रत्येक ५ किलो कचऱ्यासाठी तेवढेच पाणी टाकावे लागते. या प्लांटमुळे एलपीजीवरील अवलंबित्व निम्म्याने कमी झाले असून, दररोज सुमारे ५ लिटर पोषक स्लरीही निर्माण होते, जी वनस्पतींसाठी अत्यंत फायदेशीर आहे.

एनआयएमएसचे इन्स्टॉलेशन इन्चार्ज राजेश गावस यांच्या मते, प्लांट सुरू करण्यासाठी १५० किलो शेण आणि १,००० लिटर पाण्याची आवश्यकता असते. हे एकदा सुरू केल्यानंतर, साधारण तीन आठवड्यांत ॲनारोबिक बॅक्टेरियाचे कल्चर विकसित होते. त्यानंतर दररोज स्वयंपाकघरातील कचरा प्लांटमध्ये टाकता येतो. या प्लांटचे आयुष्यमान साधारण १५ वर्षांचे आहे. विशेष म्हणजे, प्लांटमध्ये कोणतीही दुर्गंधी येत नाही, कारण सर्व प्रक्रिया सीलबंद वातावरणात होते. या प्लांटमधून तयार होणारा मिथेन गॅस हा पर्यावरणपूरक आणि स्वच्छ पर्याय ठरत आहे.

चोपडेकर यांनी सांगितले की, प्लांटच्या स्थापनेनंतर त्यांच्या वॉर्डातील रहिवासी कचऱ्याच्या योग्य विल्हेवाटीबाबत अधिक जागरूक झाले आहेत. पूर्वी रस्त्यावर कचरा टाकणारे आता त्याचे मूल्य ओळखून आमच्या प्लांटमध्ये कचरा आणतात, असे चोपडेकर यांनी सांगितले. याशिवाय, ७ घनमीटर क्षमतेच्या मोठ्या प्लांटमधून दररोज १२ किलो ओला कचरा प्रक्रिया करून चार तासांसाठी गॅस आणि ३० लिटर स्लरी मिळू शकते. यासाठी सुमारे रु. १ लाख खर्च अपेक्षित आहे.

रूपेश चोपडेकर यांनी सांगितले की, अशा बायोगॅस प्लांट्समुळे ओल्या कचऱ्याच्या समस्येवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल आणि एलपीजीवरील अवलंबित्व कमी होईल. अधिक कुटुंबांनी घरगुती बायोगॅसचा अवलंब केल्यास कचरा व्यवस्थापन सुलभ होईल आणि गाव स्वच्छ राहील, असे चोपडेकर यांनी स्पष्ट केले.